Exh. 13

रे.क.नं. ५२/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधीशसो, कनिष्ठ स्तर कागल,**

**यांचे न्यायालयात.......**

**श्री. आनंद पांडुरंग मांडवकर वगैरे ४ ....... वादी**

**विरुद्ध**

**१) श्री. शिवाजी धोंडी मांडवकर वगैरे ४ ..... प्रतिवादी**

**यातील प्रतिवादी क्र. १ व ३ तर्फे प्रस्तुत दाव्यास कैफियत व मनाई अर्जास म्हणणे पुढीलप्रमाणे :-**

१) प्रस्तुत दावा व मनाई अर्जातील संपूर्ण मजकूर चुकीचा , खोटा, लबाडीचा व रचनात्मक असून प्रतिवादी सदर मजकुराचा स्पष्ट शब्दात इन्कार करतात.

Order
Read & Recorded
Dt.10.7.26

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.07.10 19:16:00 +0530
MADKE AJIT BHISHMA

२) दावा अर्जी कलम १ मधील दावा मिळकतीचे वर्णन अपूर्ण असून दावा मिळकती नेमक्या कोणत्या याचा बोध होत नाही. तसेच दावा मिळकतीच्या नमूद क्षेत्राच्या चतु:सिमा नमूद नसल्याने दावा मिळकतीचे नेमके वर्णन स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास व तूर्तातूर्त मनाई अर्जास सी.पी.सी. ऑर्डर ७ व रूल ३ ची बाधा येते. त्यामुळे प्रस्तुत दावा व मनाई अर्ज नामंजूर होणे पात्र आहे.

३) प्रस्तुत दाव्यामध्ये व तूर्तातूर्त मनाई अर्जामध्ये वादी यांनी वादी व प्रतिवादी यांच्या घराण्याची वंशावळ नमूद केलेली नाही. प्रस्तुत वादी

21/7/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

प्रतिवादी यांच्या नातेसंबंधाच्या माहितीकरीता वादी प्रतिवादी यांची वंशावळ पुढीलप्रमाणे :-

धोंडीराम (मयत १९७०)

| संभाजी | पांडुरंग | शिवाजी | जनाबाई | सखुबाई |
|---|---|---|---|---|
| | | | दिनकर पाटील | |
| बजरंग (प्रतिवादी नं. ४) | १) आनंदा (वा.१ )<br>२) तानाजी( वा.२)<br>३) धनाजी (प्रथमेश)<br>४) प्रकाश (वा. ३)<br>५) अजय (वा.४)<br>६) सुप्रिया (वा.५) | दत्तक मुलगा प्रथमेश (प्र.वा.३) | | |

येणेप्रमाणे वंशावळ असून प्रस्तुत प्रतिवादी नं. १ यांचा दत्तक मुलगा प्रतिवादी नं. ३ प्रथमेश असून प्रतिवादी नं. २ हे प्रतिवादी नं. ३ चे जनक वडील आहेत. तसेच धोंडीराम यांना संभाजी, पांडुरंग, शिवाजी तसेच जनाबाई व सखुबाई असे सरळ वारस आहेत. याबाबत वादी यांनी कोणताही स्पष्ट उल्लेख दाव्यामध्ये केलेला नाही. वादी यांनी दाव्यातील वंशावळीबाबत अपुरी माहिती दिली असलेमुळे प्रस्तुत दावा व मनाई अर्ज चालणेस पात्र नाही.

४) प्रस्तुत वादी नं. ४ यांनी प्रस्तुत प्रतिवादी विरुद्ध व वादी यांचे पूर्वहक्कदार यांचे विरुद्ध रे. क. नं. १७/२०१० हा दावा दाखल केलेला होता. त्या दाव्याच्या कामी मे. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर कागल यांचे न्यायालयात दि.

2/7/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

१४/०६/२०१४ इ. रोजी दावा आपसात तडजोड करण्यात आला व त्याचा हुकूमनामा करण्यात आला. त्या हुकुमनाम्याप्रमाणे प्रस्तुत दावा मिळकतींबाबत प्रतिवादी नं. ४ यांच्या मागणीप्रमाणे दावा गट नं. ३९८ ही शेतजमीन पूर्णपणे प्रतिवादी नं. ४ याना वाटपात देण्यात आली. तसेच दावा गट नं. ४२० क्षेत्र वाटपात देण्यात आले व दावा ग्रामपंचायत मिळकत नं. १६८ पैकी पश्चिम बाजू एक द्वितीयांश क्षेत्र प्रतिवादी नं. ४ यांना वाटपात देण्यात आले. तसेच प्रस्तुत प्रतिवादी नं. १ व वादी यांचे पूर्वहक्कदार पांडुरंग यांना दावा मिळकतीपैकी गट नं. ३८६ , ४१३, ४२० पैकी हे. ०.०८.५ आर तसेच दावा गट नं. ४२८ या सर्व दावा मिळकती वादी यांचे पूर्वहक्कदार व प्रतिवादी नं. १ यांना प्रत्यक्ष वाटपात हुकुमनामेप्रमाणे देण्यात यावे. वरीलप्रमाणे सर्व शेतमिळकतींचे वाटप प्रत्यक्ष झाले आहे. तसेच ग्रामपंचायत मिळकत नं. १०९,१६८ व ५८३ या मिळकती वादी चे पूर्वहक्कदार व प्रतिवादी नं. १ यांना देण्यात आले आहे. त्याबाबत हुकूमनामा करण्यात आला. वरील सर्व बाबी वादी यांनी दाव्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या नाहीत. तसेच वादींनी प्रस्तुत दाव्यामध्ये पुन्हा नव्याने वाटपाची केलेली मागणी कायदेशीर नसून रे. क.नं. १७/२०१० या दाव्याचे कामे दावा वाटपाचा असल्याने प्रत्यक्ष वाटप करून घेणे आवश्यक होते. सर्व वाटप एकाच दाव्यात करणे आवश्यक असताना स्वतंत्र दावा दाखल करून नव्याने वाटपाची मागणी करता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास सी.पी.सी. ऑर्डर २ रुल २ ची बाधा येते. त्यामुळे प्रस्तुतचा दावा व मनाई अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

५) प्रस्तुत दावा हा वाटपाकरीता व हक्कज्ञापनाकरीता दाखल केला आहे. तसेच मे. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर कागल यांचे न्यायालयातील पूर्वी दाखल केलेला रे. क. नं. १७/२०१० हा अडवा देखील वाटपाकरीता , कायम मनाईकरीता दाखल केला होता. त्या दाव्याचे काम आपसात तडजोड करण्यात आले आहे. त्यामुळे सदरची तडजोड उभय पक्षकारांवर बंधनकारक असून प्रस्तुतचा दावा त्याच

21/7/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

कारणाकरिता वादी यांना दाखल करण्याचा कायद्याने अधिकार नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास सी.पी.सी. मधील प्रिन्सिपल ऑफ रेसज्युडीकाटा कलम ११ ची बाधा येते. तसेच भारतीय पुरावा कायद्यातील estoppel of conduct and estoppel by record या तत्वाची बाधा येते. त्यामुळे प्रस्तुतचा दावा वादी यांना दाखल करून वाटपाची मागणी करण्याचा अधिकार येत नाही. त्यामुळे प्रस्तुत दावा व मनाई अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

६) वादी यांनी दाव्यामध्ये वादींच्या आई सोनाबाई पांडुरंग मांडवकर यांची सेवासुश्रुषा, खर्च केल्याची बाब खोटेपणाने नमूद केलेली आहे. तसेच रे. क. नं. १७/२०१० या दाव्याचे काम सर्व तो खर्च वादींनीच केले असलेची बाब देखील बनावट, खोटी आहे. याउलट प्रस्तुत प्रतिवादी नं. १ सोनाबाई यांची सर्व ती सेवासुश्रुषा अंतिम समयी पर्यंत केली आहे. औषधोपचाराकरीता वेळोवेळी मुरगूड येथील डॉक्टरांकडे उपचार घेतले आहेत. त्याकरीता लागणारा सर्व खर्च प्रतिवादी नं. १ यांनी केला आहे. तसेच कोल्हापूर व अन्य ठिकाणचे देखील सर्व उपचार प्रतिवादी नं. १ यांनी कै. सोनाबाई करीता घेतले आहेत. त्याचा सर्व खर्च प्रतिवादी नं. १ यांनी केलेला आहे. या सर्व बाबी वादीनी मे. कोर्टापासून जाणीवपूर्वक लपविलेले आहे. तसेच प्रतिवादी नं. १ यांना पुढील कायदेशीर वारस मूलबाळ नसलेने वादी यांचे पूर्वहक्कदार यांचा मुलगा धनाजी म्हणजेच प्रतिवादी नं. २ यांनी आपला मुलगा प्रथमेश म्हणजेच प्रतिवादी नं. ३ याला प्रतिवादी नं. १ यांना दत्तक दिले आहे. याचाच राग मनात धरून प्रतिवादी नं. १ यांची मिळकत प्रथमेश याच्याकडे मृत्यूपश्चात प्रथमेश याच्याकडे मृत्युपश्च्यात वारसाने जाऊ नये या कारणांकरीता अंतस्त वाईट हेतूने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल करून प्रतिवादी नं. ३ च्या हक्कातील नोंदणीकृत दत्तकपत्राचा दस्त क्र. १७६४/२०२१ हा दि. २/०९/२०२१ हा दस्त बेकायदेशीरपणे आव्हानित केला आहे. प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी नं. ३ यांना हिंदू दत्तक विधान कायदा ( Hindu Adocption And

21/7/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kagal

Maintenance Act) मधील तरतुदीप्रमाणे कायदेशीररित्या दत्तक घेतले आहे. त्याप्रमाणे धनाजी पांडुरंग मांडवकर यांनी दत्तक विधान पूर्ण करून देवून नोंदणीकृत दत्तक पत्राचा दस्त हिंदू धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे सर्व त्या विधी पूर्ण केलेनंतर नोंदणीकृत करून दिला आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी नं. २ च्या घराण्यामध्ये सर्व हक्क अधिकार संपुष्टात येऊन प्रतिवादी नं. १ च्या घराण्यामध्ये प्रतिवादी नं. ३ हा मुलगा नात्याने दत्तक गेला आहे त्यामुळे नोंदणीकृत दस्तानंतर व दत्तक विधीनंतर प्रतिवादी नं. ३ हा प्रतिवादी नं. १ दत्तक मुलगा म्हणून ओळखला जात आहे व तो कायदेशीर रित्या प्रतिवादी नं. १ यांच्या घराण्यामध्ये वंश चालवण्याच्या उद्देशाने दत्तक गेला आहे. प्रतिवादी नं. १ यांची सर्व ती सेवासुश्रुषा प्रतिवादी नं. १ हेच करत आहेत. प्रतिवादी नं. १ यांची दावा मिळकतीमधील हिस्सा ३ यांना प्राप्त होवू नये तसेच प्रतिवादी नं. १ हे निसंतान मयत व्हावेत या दृष्ट हेतून दत्तक पत्राचा नोंदणीकृत दस्त आव्हानित केला आहे. त्याचप्रमाणे रे.क. नं. १७/२०१० चे कामी देखील आपसात तडजोड करताना प्रतिवादी नं. १ यांचा स्वतंत्र हिस्सा जाणीवपूर्वक काढलेला नाही. सदर हिस्सा स्वतंत्र केला तर प्रतिवादी नं. १ हे आपल्या हिश्श्याचे क्षेत्र प्रतिवादी नं. ३ यांना विक्री करतील या हेतूने तशी तडजोड करण्यात आली आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा कायद्याने चालण्यास मंजूर नाही. तो नामंजूर होण्यास पात्र आहे.

७) प्रस्तुतच्या दाव्याचे कामी वादी यांना वर नमूद वंशावळीतील सर्व पक्षकारांना सामील केलेले नाही. तसेच सर्व त्या आवश्यक मिळकती दाव्यात नमूद नाहीत. वादींनी धोंडीराम यांचे सर्व वारस जनाबाई व सखुबाई यांना पक्षकार केलेले नाही. तसेच ७/१२ इतर हिस्सेदारांना देखील पक्षकार केलेले नाही. तसेच वादी नं. २ यांनी कणेरीवाडी , ता. करवीर येथील एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून खरेदी घेतलेल्या प्लॉट मिळकती गट क्र. २०१ पैकी हे. ०.१.११ आर व गट क्र. ६६ हे. ०.१.५० आर या मिळकती वडिलोपार्जित एकत्र कुटुंबांच्या मिळकतीतून घेतलेल्या

21/7/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

असल्याने या मिळकती देखील वडिलोपार्जित मिळकती आहेत. त्यामुळे या मिळकती दाव्यामध्ये दावा मिळकती म्हणून सामील करणे आवश्यक होते. तसे न केल्याने प्रस्तुत दावेस Non inchlusion od anchestral property in common hochpot या कायद्यातील तरतुदींची बाधा येते. त्यामुळे दावा नामंजूर होण्यास पात्र आहे. तसेच वर नमूद केलेप्रमाणे वादी यांनी सर्व हिस्सेदारांना पक्षकार न केल्याने Non joinder of necessary parties या तत्वाची बाधा येते. त्यामुळे प्रस्तुतचा दावा व मनाई अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

८) प्रस्तुत दावा मिळकतीची केलेली आकारणी चुकीची असून तीन घर मिळकतींचे भांडवली मूल्य पाहता ५९६५२, ४०३४४४, ४०३४४४,१७७७९१ असे असून त्याबाबत योग्य आकारणी न करता चुकीचा स्टॅम्प दिला आहे. तसेच रजिस्टर दत्तक पत्राबाबत योग्य ती आकारणी न करता हक्कज्ञापनाची मागणी केली आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११ मधील तरतुदींप्रमाणे नामंजूर होण्यास पात्र आहे. तसेच त्याच तरतुदींप्रमाणे दाव्यास कोणतेही कारण घडले नसल्याने दर्शविलेले कारण हे केवळ आभासी स्वरूपाचे असून प्रस्तुत दावा Non disclosure of cause of action या तत्वामुळे काढून टाकणेस पात्र आहे. त्यामुळे दावा व मनाई अर्ज नामंजूर करण्यात यावा.

९) प्रस्तुत प्रतिवादी यांनी गट क्र. ४१३ मध्ये स्वखर्चाने विहीर खुदाई करून विहिरीचे बांधकाम केले आहे व सुधारणा केली आहे व त्याकरिता आवश्यक तो सर्व खर्च केला आहे. याउलट वादी यांनी विनायक बोभाटे यांना सर्व दावा मिळकतीतील सर्व झाडे तोडून विक्री केली आहेत. व त्यातून रक्कम रु. ६०,०००/- इतकी रक्कम मिळविली आहे. या बाबी यादी यांनी मे. कोर्टात लपविल्या आहेत. त्यामुळे त्यांना मनाई सारखी दाद कायद्याने मिळण्यास पात्र नाही.

21/7/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

१०) प्रस्तुतचा दावा दत्तक पत्राचे हक्कज्ञापनाकरीता वादींनी प्रतिवादी विरुद्ध दाखल केला असून सदर मागणी केलेली दाद ही मुदत बाह्य स्वरुपाची असून अशा प्रकारची मागणी केलेली विनंती वादी यांना कायद्याने मिळणेस पात्र नाही.

११) प्रस्तुत प्रतिवादी यांचे विरुद्ध प्रस्तुतचा दा दाखल करून मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास वादी यांनी दिला आहे त्यामुळे प्रस्तुत वादी विरुद्ध compensatory cost रक्कम रु. १,००,०००/-(एक लाख) इतक्या रक्कमेची cost करणेबाबत आदेश करणेत यावेत.

१२) प्रस्तुत मनाई अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे याउलट अर्ज नामंजूर केलेस वादीचे काहीही नुकसान होणार नाही.

१३) प्रथमदर्शी केस प्रतिवादीचे बाजून असून न्यायाचा तराजू प्रतिवादीचे बाजूने आहे.

**१४) सबब , प्रतिवादी नं. १ व ३ यांची विनंती की,**

अ) प्रस्तुतचा वादी यांचा दावा खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब) वादी यांचे विरुद्ध compensatory cost चा आदेश करणेत यावा.

क) अन्य न्यायाचे हुकुम या कामी व्हावेत.

ड) जरूर तर कैफियत दुरुस्तीस परवानगी असावी अगर ज्यादा कैफियत देणेस परवानगी असावी.

येणेप्रमाणे कैफियत तथा म्हणणे असे.

कागल

ता. ०२/०७/२०२६ मे. जा. व्हावे.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

**प्रतिज्ञा**

आम्ही यातील प्रतिवादी क्र. १ व ३ , सत्य शपथेवर खरे सांगतो की, वरील दावेमधील मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कागल.

**ता.०२/०७/२०२६** **प्रतिज्ञा करणार**

(1) (3)

**ॲफिडेव्हिट**

मी श्री. प्रथमेश शिवाजी मांडवकर, व.व.२७, व्यवसाय – शेती , रा. वाळवे खुर्द, ता.कागल, जि. कोल्हापूर, सत्य शपथेवर खरे सांगतो की, वरील दावेमधील मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मु. कागल. **ता.** ०२/०७/२०२६

**मी ॲफिडेव्हिट करणार यांना ओळखतो.** **ॲफिडेव्हिट करणार**

**ॲड.** स्नेहल विलास पाटील

**प्रतिज्ञा**

मी श्री. प्रथमेश शिवाजी मांडवकर, व.व.२७, व्यवसाय – शेती , रा. वाळवे खुर्द, ता.कागल, जि. कोल्हापूर , सत्य शपथेवर खरे सांगतो की, वरील ॲफिडेव्हिट मधील मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कागल.

**ता.** ०२/०७/२०२६ **प्रतिज्ञा करणार**

Solemnly Affirmed before me by
Shri Prathmesh Shivaji Mandavkar
Aged 27 of Kagal Kolhapur who is
identified by Shri Smt S.V. Patil
Adv. whom I know personally
Dated :- 2/7/2026

Assistant Superintendent
Kagal.